मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे – ४०१ १०१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मिभामनपा/लेवि/275/2024-25
दिनांक :- 28/11/2024

प्रति,
विभाग प्रमुख
सर्व विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

विषय :- सन 2024-25 सुधारीत अंदाजपत्रक व सन 2025-26 चा मुळ अर्थसंकल्प बनविणेबाबत.

संदर्भ :- मनपा/ले.वि./आयुक्त/268/2024-25 दि.26/11/2024.

महोदय,

वरील संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 95 नुसार महानगपालिकेचा सन 2024-25 चा सुधारीत व सन 2025-26 चा मुळ अर्थ संकल्प तयार करुन मा. आयुक्त तथा प्रशासक यांना सादर करावयाचा आहे.

सर्व विभाग प्रमुखांनी स्वत: जातीने लक्ष देवून उपरोक्त परीपुर्ण माहिती दि.11/12/2024 पर्यंत बिनचुकपणे व कालमर्यादेत लेखा विभागाकडे सादर करावी.

(डॉ. का.रा. जाधव)
मुख्य-लेखा व वित्त अधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सादर,

सन २०२४-२५ चे सुधारित व सन २०२५-२६ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्यासाठी सर्व संबंधित विभाग प्रमुख /खाते प्रमुख तसेच प्रभाग समिती प्रमुख यांचेकडून अंदाजपत्रकाची माहिती मागविणेसाठी पाठवावयाच्या परिपत्रकाचा मसुदा सोबत मान्यतेस्तव सादर केला आहे. सदर परिपत्रकानुसार नियमित अंदाजपत्रकासाठी आवश्यक माहिती, महापालिकेने स्वीकारलेल्या दायित्वाची माहिती, जेंडर बजेटची माहिती, भांडवली कामांच्या यादया, सबसिडी अहवाल मागविण्यात येत आहे. तरी, सोबत जोडलेल्या परिपत्रक मंजुरीस्तव सादर.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,

मा.अतिरिक्त आयुक्त - १

मा.महापालिका आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे ४०१ १०१ दुरध्वनी क्र. : २८१९२८२८/२८१९३०८७

MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

जा. क्र. मनपा/लेखा/ २०८ /२०२४-२५ दिनांक. २८/११/२०२४

अर्थसंकल्पीय अंदाज

तातडीचे / तात्काळ

परिपत्रक

सर्व विभाग प्रमुख,

विषय : सन २०२४-२५ चे सुधारित व सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणेबाबत...

आपणास कळविण्यात येते की, सन २०२४-२५ चे सुधारित व सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९५ नुसार तयार करण्यासाठी सोबतच्या प्रपत्रात आपल्या विभागासंबंधीची माहिती लेखा विभागाकडे पाठवावी.

सर्व विभाग प्रमुख यांनी आपल्या विभागाचे / अंदाजपत्रक तयार करताना विशेष काळजी घ्यावी. सन २०२४-२५ मधील आतापर्यंत प्राप्त उत्पन्न व प्रत्यक्ष झालेला खर्च या सर्व परिस्थितीचा विचार करुन सन २०२४-२५ च्या सुधारित अंदाजपत्रकातील जमा व खर्चासाठी तरतुदी प्रस्तावित कराव्यात.

सन २०२४-२५ चा सुधारित व सन २०२५-२६ चा मूळ अर्थसंकल्प तयार करताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (ब) अन्वये तसेच लेखा संहिता १९७१ नमुना क्र. १० अन्वये पुनर्विनियोजन केलेल्या ठरावानुसार सन २०२४-२५ मध्ये व सन २०२५-२६ मध्ये होणा-या खर्चाचे नियोजन करुन तरतुदी प्रस्तावित कराव्यात. तसेच सन २०२४-२५ महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ नमुना क्र. १० अन्वये पुनर्विनियोजन केलेल्या प्रस्तांवाची माहिती सोबतच्या नमुना नं.३ (ब) मध्ये देण्यात यावी.

सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पाची माहिती देताना सन २०२४-२५ मध्ये प्राप्त होणा-या उत्पन्नाचा विचार करता कोणत्याही खर्चाच्या लेखाशीर्षात अवास्तव वाढ न करता शक्यतो आपल्या विभागास देण्यात आलेल्या मूळ तरतुदीमध्येच वाढ/ घट प्रस्तावित करावी.

उत्पन्नाची बाजू निश्चित करताना उत्पन्नाचे नवीन स्त्रोत शोधावेत. मागील ३ वर्षात प्राप्त झालेले सरासरी उत्पन्न विचारात घेऊन जमा बाजूसाठी तरतुदी प्रस्तावित कराव्यात. लेखाशीर्षनिहाय अंदाजामध्ये अचूकपणा व वास्तवता असावी तसेच हे अंदाज प्रत्यक्ष रकमांच्या जास्तीत जास्त जवळचे असावेत यासाठी दक्षता घ्यावी. ज्या करांची मागणी निश्चित (Demand fix) आहे त्याबाबतीत प्रत्यक्ष मागणी (Demand) रकमा विचारात घेऊनच तरतुदी प्रस्तावित कराव्यात. तसेच जमा रकमांच्या

बाबतीत चालू मागणी, मागील एकूण थकबाकी व नवीन वर्षात नव्याने होणारी अंदाजे मागणी यांच्या रकमा वेगवेगळया दर्शवून तरतुदी सादर कराव्यात. सोबत थकबाकीचा वर्षनिहाय तक्ता सुद्धा जोडण्यात यावा. उत्पन्नावर आधारित खर्चाचे अंदाज निश्चित होत असल्याने अवास्तव तरतुदी प्रस्तावित करु नयेत.

सन २०२४-२५ चे सुधारित व सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना आतापर्यंत मंजूर करण्यात आलेली कामे व त्यांच्यावर सन २०२४-२५ व सन २०२५-२६ मध्ये होणारा प्रत्यक्ष खर्च याची अचूक माहिती घेऊनच खर्चाच्या तरतुदी प्रस्तावित कराव्यात.

जमा बाजू

१) **मालमत्ता कर** : मालमत्ता कराचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना थकीत मागणी, चालू मागणी व नव्याने होणा-या मालमत्तांची मागणी विचारात घेऊन तरतुदी प्रस्तावित करण्यात याव्यात. महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्तांना कराची आकारणी झाली असल्याची खात्री करावी. मालमत्ता कराची अतिरिक्त माहिती नमुना नं.४ मध्ये देण्यात यावी.

२) **वस्तू व सेवा कर** : शासनाने वस्तू व सेवा कर (G.S.T.) दि.१ जुलै २०१७ पासून लागू केलेला आहे. शासन निर्णयानुसार महापालिकांना वस्तू व सेवा कराच्या हिस्स्यापोटी जे अनुदान प्राप्त होणार आहे त्यात दरवर्षी होणारी वाढ गृहित धरुन वस्तू व सेवा कर अनुदानाच्या तरतुदी प्रस्तावित कराव्यात. वस्तू व सेवा कर लागू होण्यापूर्वी स्थानिक संस्था करांची थकबाकी तसेच जकातीची थकबाकी वसूल होणार असल्यास त्यांचाही अंतर्भाव करावा.

३) **शासन मुद्रांक शुल्क अधिभाराची रक्कम** : प्रलंबित असलेल्या सन २०२४-२५ व सन २०२५-२६ मधील मुद्रांक शुल्क अधिभाराची शासनाकडून अपेक्षित रकमेचाही अंतर्भाव करावा.

४) **पाणी पुरवठा आकार** : पाणी खरेदी व त्याच्या वितरणावर होणारा खर्च व पाणी पुरवठयाची वसुली यामध्ये बरीच तफावत आढळते. पाणी पुरवठा बिलांच्या वसुलीची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. पाणी पुरवठा आकाराची थकीत मागणी, चालू मागणी व नव्याने होणा-या मालमत्तांची मागणी हिशेबात घेऊन तरतुदी प्रस्तावित कराव्यात. पाण्याचे अनधिकृत नळ कनेक्शन असल्यास ते बंद करुन त्यांना नियमानुसार शोधून काढून त्यांना वसुलीच्या मुख्य प्रवाहात आणावे. थकबाकीदारांवर दंडात्मक कारवाई केल्यास उत्पन्नात वाढ होऊ शकेल. पाणी पुरवठा आकाराची अतिरिक्त माहिती नमुना नं.६ मध्ये देण्यात यावी.

५) **विकास आकार व मोकळया जागेवरील कर** : विकास कर व मोकळया जागेवरील कराच्या तरतुदी प्रस्तावित करताना मिरा-भाईंदर शहरात सुरु असलेली विकास कामे , आतापर्यंत विभागाकडे प्राप्त झालेल्या विकास प्रस्तावांची माहिती घेऊन, त्या पासून किती उत्पन्न प्राप्त होईल याचा अंदाज घेऊन तरतुदी प्रस्तावित कराव्यात. तसेच यापूर्वी प्रतिवर्षी होणारी प्रत्यक्ष वाढ याचाही विचार करावा.

६) **स्थावर मालमत्तांपासून भाडे** : दरवर्षी महापालिकेच्या स्थावर मालमत्तांमध्ये वाढ होत आहे. परंतु त्यापासून मिळणा-या उत्पन्नात वाढ झालेली दिसून येत नाही. सदर मालमत्तांची नोंदणी स्थावर मालमत्ता विभागाकडे अद्ययावत असणे आवश्यक आहे. तसेच किमान या मालमत्तांच्या देखभाल व दुरुस्तीवरील खर्चाइतके उत्पन्न या मालमत्तांपासून मिळणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित विभागांनी उत्पन्न वाढीसाठी प्रस्ताव सादर करावेत. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीच्या सर्व मालमत्तांची यादी तयार करुन त्या कशाप्रकारे, कोणाला व किती रकमेला हस्तांतरीत करण्यांत आलेल्या आहेत याची सविस्तर माहिती सादर करावी. सर्व मालमत्तांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ अन्वये बाजारभावानुसार भाडे आकारण्यात आल्याबाबत खात्री करावी व जर बाजारभावानुसार भाडे आकारण्यात आलेले नसेल अशा मालमत्तांना बाजारभावानुसार भाडे आकारणी करावी.

७) **करेत्तर महसुलाचे अंदाज** : वरील कर व आकाराव्यतिरिक्त महापालिका आकारत असलेल्या इतर बाबींपासून उत्पन्न उदा. भाडे, शुल्क, फी इत्यादी साठी अंदाज प्रस्तावित करताना चालू बाजारभावानुसार भाडे, सेवा पुरविण्यासाठी येणा-या खर्चाच्या प्रमाणात पर्याप्त असे आकार व ज्या ज्या शुल्कामध्ये व फी मध्ये वाढ करण्यात आली आहे त्याप्रमाणे तपशीलवार प्रस्ताव तयार करण्यात यावेत.

काही विभागाचे दर हे एक वर्षापेक्षा जास्त वर्षाचे मंजुर असुन सन २०२५-२६ मधील मंजुर दरानुसार उत्पन्न प्रस्तावीत करावेत. महसुली उत्पन्न जमा करणा-या विभागाने त्यांच्या मार्फत आकारण्यात येणा-या कर, फी, शुल्क, आकार, दंड इत्यादींचे सद्या मंजुर दराची महासभा ठरावासह व सन २०२५-२६ मध्ये प्रस्तावीत करण्यात येणा-या दरांची माहिती सोबत देण्यात यावी.

८) **सन २०२५-२६** मध्ये करामध्ये वाढ करावयाची असल्यास विभागाने कर वाढीचा प्रस्ताव मंजुर करुन घेऊन, ठराव प्राप्त झाल्यानंतर त्यामुळे होणारे उत्पन्न वाढ विचारात घेऊनच अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात उत्पन्न/जमा रकमा सादर कराव्यात.

९) **अनुदान / कर्जे** : ज्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पांसाठी शासनाकडून अनुदान मिळते, कर्ज घेण्याचे विचाराधीन आहे त्या योजनानिहाय कर्ज व अनुदानाच्या स्वतंत्र तपशीलवार माहितीसह अंदाज प्रस्तावित करण्यात यावे. ज्या बाबींसाठी शासनाकडून नियमितपणे अनुदान मिळते, त्या अनुदानाच्या अनुज्ञेय थकीत रकमेसह तरतूद प्रस्तावित करावी. शासनाकडून मिळणा-या अनुदानाची बाबनिहाय माहिती दयावी. अमृत योजनेंतर्गत अपेक्षित अनुदान व उभारावे लागणारे कर्ज यांची अचूक व कामाच्या प्रगतीनुसार माहिती दयावी.

खर्च बाजू

१) **आस्थापना खर्च (वेतन व इतर भत्ते)** : कर्मचारी आस्थापनेवरील खर्चासाठी तरतुदी प्रस्तावित करताना वेतन, वार्षिक वेतनवाढ, महागाई भत्त्यातील वाढ, सानुग्रह अनुदान, तसेच रिक्त पदे, इतर भत्त्यांवरील खर्च, अतिरिक्त वेतनवाढी लागू असलेल्या विविध परीक्षांसाठी मंजुरी देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या व त्यामुळे वेतनात होणारी वाढ इत्यादी खर्चासह तरतुदी प्रस्तावित

कराव्यात. महापालिका अधिकारी/ कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोगानुसार देय असलेल्या फरकाची रक्कम प्रस्तावित कराव्यात. वेतनासाठी प्रस्तावित तरतुदींचा तपशील नमुना नं.५ (अ) व ५(ब) मध्ये देण्यात यावा.

बऱ्याच विभागांकडून आऊटसोर्सिंगद्वारे कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले असून विविध लेखाशीर्षांतून त्यांच्या वेतनाचा खर्च करण्यात येत आहे. यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष नसल्यास आस्थापना खर्चाची टक्केवारी काढतांना माहिती उपलब्ध होत नाही. त्यामुळे याबाबतची स्वतंत्र माहिती नमुना नं.६ मध्ये देण्यात यावी.

२) **दुरुस्ती, निगा व देखभाल** : विभागांकडील उपकरणे, यंत्रसामुग्री, वाहने यांची दुरुस्ती, निगा व देखभाल तसेच इमारती, रस्ते व इतर बांधकाम, विद्युत दुरुस्ती याबाबत तपशीलवार माहिती देऊन तरतुदी प्रस्तावित करण्यात याव्यात. हमी कालावधीत दुरुस्तीसाठी खर्च येत नसल्यामुळे अशा बाबींवरील खर्च अंतर्भुत करण्यात येऊ नयेत.

३) **भांडवली खर्च** : नवीन भांडवली कामे प्रस्तावित करण्यापुर्वी अपूर्ण कामे व मंजूर झालेली परंतु सुरु न झालेली कामे पूर्ण करुन त्या नागरिकांच्या वापरासाठी उपलब्ध होतील याची दक्षता विभाग प्रमुखांनी प्रथमतः घ्यावी. भांडवली कामांची माहिती नमुना नं.२ (अ) व २ (ब) मध्ये देण्यात यावी.

कर्ज निधीमधून करावयाच्या भांडवली कामांची माहिती नमुना नं.०९ मध्ये देण्यात यावी.

जंगम व स्थावर मालमत्तांचे हिस्ट्री शिट ठेवण्यात यावे. ज्यामध्ये कामाचे पूर्ण नाव, जागेची माहिती, प्रशासकीय व वित्तीय मान्यतेची माहिती, ठेकेदार /पुरवठादाराचे नाव, सदरचे काम कोणत्या वर्षी सुरु झाले, कधी पूर्ण झाले, कोणत्या लेखाशीर्षातून ते करण्यात आले आहे, त्यावर झालेला एकूण खर्च , त्याचे आयुष्यमान, त्याच्यावर होणारी दुरुस्ती व त्यासाठी येणारा खर्च इत्यादी सविस्तर माहिती या रजिस्टरमध्ये नोंदविण्यात यावी.ज्यामुळे छोटया स्वरुपाच्या कामांवर वारंवार होणारा खर्च टाळता येईल. आतापर्यंत हाती घेण्यात आलेल्या कामांचे पुढील दोन ते तीन वर्षाच्या आर्थिक नियोजनासह दायित्व स्वीकारल्याने त्या त्या आर्थिक वर्षात भांडवली खर्चाची तरतूद या कामांच्या प्रदानासाठी उपलब्ध करुन दयावी लागणार असल्याने त्याचा समावेश तरतुदीमध्ये करण्यात यावा.

४) **कर्ज विवरण पत्र** : नियम २५ (२),(३) कर्ज दायित्व नमुना क्र. ८ मधील विवरण पत्र सादर करावे.

५)भांडवली कामांसाठी प्राप्त झालेल्या अनुदानाची माहिती :

सन २०२०-२१ पासुन भांडवली कामांसाठी पायाभुत सोयी सुविधांतर्गत मोठया प्रमाणात अनुदान प्राप्त होत असते. त्यामुळे प्राप्त झालेल्या कामनिहाय अनुदानाची माहिती, शासन निर्णयाची प्रत तसेच शासन निर्णयानुसार महापालिकेने दयावयाचा हिस्सा यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करावी लागणार आहे. अशा प्रस्तावांना ७२ ब मध्ये मान्यता घेतली असल्यास त्याबाबतच्या ठरावाची प्रत, आतापर्यंत प्राप्त झालेल्या अनुदानातुन दि. ३०.११.२०२४ पर्यंत केलेला खर्च, दि. ३१.०३.२०२५ पर्यंत अपेक्षित खर्च व सन २०२५-२६ मध्ये करावयाचा खर्च इत्यादींची अचुक माहिती नमुना नं.७ मध्ये देण्यात यावी.

अर्थसंकल्पासाठी प्रत्येक लेखाशीर्षाखाली तरतुदी कशा निश्चित करण्यात आल्या आहेत त्याबाबतची प्रत्येक लेखाशीर्षनिहाय टिप्पणी / अहवाल सोबत देण्यात यावा. मोघम व अवास्तव तरतुदी प्रस्तावित करु नयेत. तपशीलवार माहिती, लागू असलेल्या दर व करांच्या दरांची माहिती, भांडवली कामांतर्गत सुरु असलेल्या कामांची माहिती देखील सोबत देण्यात यावी.

उत्पन्नाच्या/ खर्चाच्या कोणत्याही बाबीसाठी अनावधानाने तरतूद करण्याचे राहणार नाही याबाबत पुन्हा पुन्हा खात्री करण्याची विभाग प्रमुखांनी विशेष दक्षता घ्यावी.

ज्या विभागांकडून माहिती वेळेवर उपलब्ध होणार नाही त्या विभागासाठी तरतुदी करताना काही त्रुटी राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखाची राहील. अर्थसंकल्प तयार करताना पुढील आर्थिक वर्षात लागणा-या तरतुदीची यादी सोबत जोडून पाठविल्यानंतर त्या व्यतिरिक्त कोणतेही नवीन काम पुढील आर्थिक वर्षात स्विकारले जाणार नाही. त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी प्रस्तावित करताना सर्वंकष विचार करुन सादर कराव्यात.

आर्थिक वर्ष संपल्यावर ब-याच तरतुदी अखर्चित राहतात त्यामुळे जी गरजेची कामे त्या आर्थिक वर्षात करणे आवश्यक असते ती तरतुदी अभावी करता येत नाहीत ही बाब यापुढे गांभीर्याने घेणार असल्याने अनावश्यक व अवाजवी तरतुदी प्रस्तावित केल्यास व त्या वर्ष समाप्तीतील शिल्लक राहणार नाही याची दक्षता विभाग प्रमुखांनी घ्यावी. कोणत्याही कामांसाठी नुसती टोकन तरतूद प्रस्तावित करु नये. त्यामुळे अनावश्यक दायित्व निर्माण होऊन महापालिकेची आर्थिक स्थिती ढासळू शकते.

संबंधित विभाग प्रमुखांनी नियमित अर्थसंकल्पाबरोबर सन २०२४-२५ मधील अर्थसंकल्पीय निवेदनातील साध्य केलेले उद्दिष्ट किंवा केलेली कार्यवाही याबाबतची माहिती तसेच सन २०२५-२६ मधील अर्थसंकल्पीय निवेदन, जेंडर बजेटची माहिती, सन २०२३-२४ मधील सबसिडी अहवाल, OUTCOME (फलश्रुती अंदाज), भांडवली कामांच्या याद्या लेखा विभागाकडे **दि.११.१२.२०२४** पुर्वी मुदतीत सादर कराव्यात.

संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

लेखा विभाग
दिनांक :२४ नोव्हेंबर २०२४.

सन २०२४-२५ सुधारित व सन २०२५-२६ मुळ अर्थ संकल्पातील ठळक मद्दे :

अर्थसंकल्पाचे परिपत्रक सर्व विभागांना पाठविण्यात आले असुन सदरची माहिती दि. ११.१२.२४ पर्यंत द्यावयाची आहे.

जमा बाजु

१. सन २०२५-२६ प्राप्त होणा-या उत्पन्नाचा विचार करता अवास्तव वाढ न करता मागील ३ वर्षात प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा विचार करुनच उत्पन्नामध्ये वाढ अथवा घट करावी.

२. उत्पन्नाची बाजु निश्चित करतांना उत्पन्नाचे नव-नविन मार्ग शोधावेत, उत्पन्न वाढ कशा प्रकारे हाईल याचा विचार करावा.

३. कोणत्याही कराची मागील थकबाकी असल्यास ती वसुली करण्याचे प्रयत्न करावेत. कराची मागणी (Demand Fix) निश्चित करून त्या रकमा विचारात घेऊन कराच्या तरतुदी प्रस्तावित कराव्यात.

४. शासनाकडून जी अनुदाने मिळणे बाकी आहेत त्याचा पाठपुरावा करुन शासनाकडून जास्तीत जास्त विकास कामांसाठी अनुदाने प्राप्त करुन घेण्यासाठी विभागाने प्रयत्नशिल राहावे. जेणेकरुन महापालिकेवर त्या कामाचा भार पडणार नाही.

५. महापालिकेच्या बहुतांश स्थावर मालमत्ता आहेत. यामध्ये BOT वर चालणारे Aminity Hall, तसेच मार्केट, भुईभाड, सदनिका, क्रिडा संकुल, समाज मंदिर व इतर मालमत्तांपासुन मिळणारे भाडे यांच्यापासुन मिळणा-या उत्पन्नात वाढ दिसुन येत नाही. यामध्ये चालु बाजारभाव नुसार वाढ कशी करता येईल याचा अंदाज बांधुन तरतुदी प्रस्तावित कराव्यात.

६. नगररचना विभागाने त्यांना दिलेल्या नमुना नं.९ मध्ये स्वयंस्पष्ट व संपुर्णतः माहिती भरुन द्यावी. अपुरी माहिती देण्यात येऊ नये.

७. सन २०२५-२६ मध्ये करामध्ये वाढ करावयाची असल्यास कर वाढीचा प्रस्ताव/ ठराव करुन घेऊन त्यामुळे होणारे उत्पन्नाची वाढ विचारात घेऊन अर्थसंल्पात त्या रकमा सादर कराव्यात

खर्च बाजु

१. कर्मचारी वेतन, सानुग्रह अनुदान व इतर भत्त्यांसाठी आवश्यक ती तरतुद करण्यासाठी विशेष करुन ७ व्या वेतन आयोगाच्या द्यावयाच्या थकबाकी रकमेची तरतुद करावी.

२. विभागाकडून आऊटसोर्सिंगव्दारे बहूतांश कर्मचा-यांची नेमणुक करण्यात आली असुन कर्मचारी किती व कोणत्या कामांसाठी त्याची आवश्यकता आहे. याची शहानिशा करुन त्यानुसार त्यांच्या वेतनासाठी वेगळी तरतुद करण्यात यावी.

३. महापालिकेचा बांधील खर्च (Committed Expenditure) हा वाढत असल्याने अत्यावश्यक असेल तीच कामे प्रस्तावित करण्यात यावीत. अवास्तव खर्च अथवा कामे वाढविण्यात येऊ नयेत.

४.नविन भांडवली कामे प्रस्तावित करण्यापुर्वी मागील जी कामे चालु आहेत ती कामे प्रथमत: पुर्ण कशी होतील अशाच कामांना तरतुदी असाव्यात. या कामासाठी लागणारा मनपा हिस्सा/शासन अनुदान याचे स्पष्टीकरण देण्यात यावे.

५. महापालिकेचे दायित्व दिवसेंदिवस वाढत आहे. यामध्ये प्रामुख्याने विकास कामांचा Spill Over, ठेकेदारांची प्रलंबित देयके MMRDA कडून घेण्यात आलेले कर्ज यासाठी प्रथमत: तरतुद करण्यात यावी.

६. शासनाकडून विविध भांडवली कामांसाठी मुलभुत सोयी सुविधा अंतर्गत मंजुर अनुदानानुसार मनपा हिस्सा अर्थसंल्पीय अंदाज सादर करतेवेळी विचारात घ्यावा.

७. अर्थसंल्पात प्रत्येक लेखाशिर्षाखाली तरतुदी कशाप्रकारे निश्चित केल्या आहेत याबाबत लेखाशिर्षनिहाय टिप्पणी/अहवाल सोबत देण्यात यावा.

८. विभागाने नमुना क्र. ७ मध्ये ७२(ब) नुसार चालू वर्षापासुन पुढील वर्षापर्यंत दायित्व निर्माण करणा-या कामांची माहिती नमुन्यामध्ये भरुन सादर करावी.

९. सर्व विभागांनी संबंधित नमुन्यामध्ये माहिती भरुन सादर करावी.

मिरा भाईंदर महानगरपालिका

सन २०२५-२०२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज (सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पासह)

नमुना नं.१

-------------------- विभागाचे नांव

जमा / खर्च बाजू
रु. लाखांत

अ.क्र.	लेखाशीर्ष	लेखाशीर्ष संकेतांक	सन २०२४-२५ ची मूळ तरतूद	मंजुर प्रस्तावानुसार खर्च	दि.३०.११.२०२४ पर्यंतच्या प्रत्यक्ष खर्च	दि.१.१२.२०२४ ते दि.३१.३.२०२५ पर्यंत अपेक्षित खर्च	सन २०२४-२५ चे सुधारित अंदाज	सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज		
								अनु क्र. ५ नुसार मागील प्रस्तावानुसार	२०२५-२६ मधील प्रस्तावीत रक्कम	सन २०२५-२६ चा एकुण अंदाज
१	२	३	४	५	६	७	८(६+७)	९		
एकुण जमा/खर्च										

विभाग प्रमुखाची सही

मिरा भाईंदर महानगरपालिका
सन २०२४-२५ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज
नमुना नं.२ (अ)
एम.ए.कोड नियम २५ (२) (ब)
भांडवली कामांसाठी करावयाच्या तरतुदींचा तपशील (दि. ३१.०३.२०२४ पुर्वी मध्ये हाती घेतलेल्या कामांसाठी)

लेखाशीर्ष	कामाचा तपशील	अंदाजखर्च	प्रशासकीय मान्यतेचा संदर्भ	कामाची व्याप्ती	कामाचा कालावधी	निविदा रक्कम	दि. ३१.०३.२०२४ पर्यंत झालेला खर्च	दि. ०१.०४.२०२४ ते ३०.११.२०२४ पर्यंत झालेला खर्च	दि. ३१.०३.२०२५ पर्यंत होणारा अपेक्षित खर्च	सन २०२४-२५ मधील एकुण खर्च	सन २०२५-२६ साठी तरतुद	शेरा
२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४

विभाग प्रमुखाची सही

मिरा भाईंदर महानगरपालिका
सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज
नमुना नं.२ (ब)
एम.ए.कोड नियम २५ (२) (ब)
भांडवली कामांसाठी करावयाच्या तरतुदींचा तपशील
(सन २०२४-२५ मध्ये हाती घेतलेल्या व सन २०२५-२६ मधे हाती घ्यावयाच्या आवश्यक नवीन कामांसाठी)

लेखाशीर्ष	कामाचा तपशील	अंदाजखर्च	प्रशासकीय मान्यतेचा संदर्भ	कामाची व्याप्ती	कामाचा कालावधी	निविदा रक्कम	पैकी २०२४-२५ मधील होणारा अंदाजित खर्च	त्या पुढील वर्षाचे आर्थिक नियोजन असल्यास वर्षनिहाय माहिती	शेरा
२	३	४	५	६	७	८	९	१०	११

विभाग प्रमुखाची सही

मिरा भाईंदर महानगरपालिका
सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज
नमुना नं. ३ (अ)
अधिनियमातील कलम ७२ ब नुसार मंजुर केलेल्या प्रस्तावाची रक्कम

लेखाशीर्ष	कामाचा तपशील	अंदाजखर्च	प्रशासकीय मान्यतेचा संदर्भ	कामाची व्याप्ती	कामाचा कालावधी	निविदा रक्कम	सन २०२४-२५ मधील अपेक्षित एकुण खर्च	सन २०२५-२६ मधील तरतुद	त्यापुढील वर्षाचे आर्थिक नियोजन असल्यास त्याची वर्ष निहाय माहिती	शेरा
२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२

विभाग प्रमुखाची सही

मिरा भाईंदर महानगरपालिका
सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज
नमुना नं.३ (ब)

अधिनियमातील कलम महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ नमुना क्र. १० नियम क्र. ३०(३) नुसार मंजूर केलेल्या प्रस्तावांची/कामांची माहिती

या लेखाशिर्षातुन					या लेखाशिर्षात					
प्रधान, गौण तपशिलवार शिर्ष	लेखाशिर्ष	मुळ अनुदान	झालेला खर्च	उपलब्ध शिल्लक	प्रधान, गौण तपशिलवार शिर्ष	लेखाशिर्ष	मुळ अनुदान	झालेला खर्च	प्रस्तावित वाढीची रक्कम	अभिप्राय
२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२

विभाग प्रमुखाची सही

मिरा भाईंदर महानगरपालिका
सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज
नमुना नं.४

मालमत्ता कराबाबतची माहिती

मालमत्ता कर विभाग	मालमत्तांची एकूण खाती				एकूण वार्षिक मागणी - २०२४-२५		
	निवासी		बिगर निवासी		मागील थकबाकी	चालू मागणी	एकूण
	अधिकृत	अनधिकृत	अधिकृत	अनधिकृत			
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.

दि.१:४.२०२४ ते ३०.११.२०२४ पर्यंत प्रत्यक्ष वसुली			दि.१.१२.२०२४ ते ३१.०३.२०२५ पर्यंत अपेक्षित वसुली			एकूण वार्षिक मागणी - २०२५-२०२६		
मागील थकबाकी	चालू मागणी	एकूण	मागील थकबाकी	चालू मागणी	एकूण	मागील थकबाकी	चालू मागणी	एकूण
९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७

उपआयुक्त ,
(मालमत्ता कर विभाग)

मिरा भाईंदर महानगरपालिका

सन २०२५-२०२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज

नमुना नं.५ (अ)

MCA १९७१ नमुना क्र. ५ नियम २५ (२) (अ)

विभाग अथवा कार्यालय

आस्थापनांच्या वेतनासाठी प्रस्तावित तरतुदीचा तपशीलांचे विवरणपत्र, वर्ष २०२५-२०२६

(Statement of details of Provision Proposed for pay of Officers *Establishments) for the year 2025-2026

(रु. लाखांत)

अ.क्र	विभाग	मंजुर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	पदाचे मंजूर वेतन			स्तंभ (३) (क) मधील दराने वर्षाची तरतूद रक्कम	वर्षभरात देय होणारी वेतनवाढ			वर्षातील एकूण तरतूद म्हणजे स्तंभ (३) , (४) ची बेरीज	महागाई भत्ता वाढ, फरक व संभाव्य वाढ	सातव्या वेतन प्रलंबित हाफ्त्याची रक्कम	सन २०२५-२६ वर्षाची तरतुद (५), (६) व (७) ची बेरीज
					किमान	कमाल	पुढील वर्षी च्या १ एप्रिल रोजी प्रत्यक्ष देय वेतन		वेतनवाढी चा दिनांक	वेतनवाढीचा दर	वेतनवाढी ची या वर्षातील रक्कम				
					(अ)	(ब)	(क)		(अ)	(ब)	(क)				
१.		२						३	४			५	६	७	८

आस्थापना अधीक्षकांची सही

मिरा भाईंदर महानगरपालिका
सन २०२५-२०२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज
नमुना नं.५ (ब)

विभाग अथवा कार्यालय

(DEPARTMENT OR OFFICE)

अधिका-यांच्या (आस्थापनांच्या) वेतनासाठी प्रस्तावित तरतुदीचा तपशीलांचे विवरणपत्र, वर्ष २०२४-२०२५

(Statement of details of Provision Proposed for pay of Officers *Establishments) for the year 2024-2025

(सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पासह)

आस्थापना विभाग

जमा / खर्च बाजू
रु. लाखांत

अनु	विभागाचे नाव	लेखाशीर्ष संकेतांक	सन २०२४-२५ ची मूळ तरतूद	दि.३०.११.२०२४ पर्यंतच्या प्रत्यक्ष खर्च	दि.१.१२.२०२४ ते दि.३१.३.२०२५ पर्यंत अपेक्षित खर्च	सन २०२४-२५ चे सुधारित अंदाज
१	२	३	४	५	६	७(५+६)

विभाग प्रमुखाची सही

मिरा भाईंदर महानगरपालिका
सन २०२५-२०२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज
नमुना नं.५ (क)
आऊटसोर्सिंगद्वारे आस्थापना खर्चाची माहिती

	आऊटसोर्सिंगद्वारे काम करीत असलेल्या कर्मचा-यांची माहिती						
आऊटसोर्सिंगद्वारे काम करीत असलेल्या कर्मचा-यांचे पदनाम	आऊटसोर्सिंगद्वारे काम करीत असलेल्या कर्मचा-यांची संख्या	मंजूर कालावधी दिनांक ते दिनांक ----------	दरमहाचे वेतन	वार्षिक खर्च	ज्या लेखाशीर्षातून सदरचा खर्च करण्यात येतो त्या लेखाशीर्षाचे नाव व संकेतांक	सन २०२४-२५ सुधारित खर्च	सन २०२५ मधील होण खर्च
१	२	३	४	५	६	७	८
१.							
२.							
३.							

विभाग प्र

मिरा भाईंदर महानगरपालिका
सन २०२४-२०२५ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज
नमुना नं.६
पाणी पुरवठा आकाराची माहिती

णी पुरवठा विभाग	एकूण नळ संयोजने				एकूण वार्षिक मागणी - २०२४-२५		
	निवासी		बिगर निवासी (व्यवसायीक)		मागील थकबाकी	चालू मागणी	एकूण
	अधिकृत	अनधिकृत	अधिकृत	अनधिकृत			
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.

दि.१.४.२०२४ ते ३०.११.२०२४ पर्यंत प्रत्यक्ष वसुली			दि.१.१२.२०२४ ते ३१.०३.२०२५ पर्यंत अपेक्षित वसुली			एकूण वार्षिक मागणी - २०२५-२०२६		
गील थकबाकी	चालू मागणी	एकूण	मागील थकबाकी	चालू मागणी	एकूण	मागील थकबाकी	चालू मागणी	एकूण
९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७

कार्यकारी अभियंता
(पाणी पुरवठा विभाग)

मिरा भाईंदर महानगरपालिका
सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज
अनुदानाबाबतची माहिती
नमुना नं.७

खाशीर्ष	शासन निर्णय क्रमांक व दिनांक	कामाचे नाव	अंदाजखर्च	प्रशासकीय मान्यतेचा संदर्भ	निविदा रक्कम	प्राप्त झालेला निधी	महापालिका हिस्सा	७२ ब अन्वये मान्यता घेतली असल्यास ठराव क्रमांक व दिनांक	३१.३.२०२४ पर्यंत झालेला खर्च	दि.१.४.२०२४ ते ३०.११.२०२४ पर्यंत झालेला खर्च	दि.३१.३.२०२५ पर्यंत होणारा अपेक्षित खर्च	२०२४-२५ मधील एकूण खर्च	२०२५-२६ मधील एकूण खर्च	शेरा
२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६

दि.१.१२.२०२४ नंतर प्राप्त होणा-या अनुदानाची माहिती उपरोक्त तक्त्यात दरमहा देण्यात यावी.

विभाग प्रमुखाची सही

मिरा भाईंदर महानगरपालिका

सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज

नमुना नं.८

एम.ए.कोड नियम २५ (२) (क)

कर्ज निधीतून करावयाच्या कामांचा तपशील

कर्जाचा तपशील	रक्कम	कामाचे नांव	अंदाजखर्च	सन २०२४-२५ मधील अपेक्षित खर्च	सन २०२५-२६ साठी अपेक्षित खर्च	शेरा
१	२	३	४	७	८	९

विभाग प्रमुखाची सही

मिरा भाईंदर महानगरपालिका
सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज
नमुना नं.९
नगररचना विभाग-विकास आकाराबाबतची माहिती

अ.क्र	लेखाशिर्ष	एकूण वार्षिक मागणी - २०२४-२५			सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज	शेरा
		दि.३०.११.२०२४ पर्यंतच्या प्रत्यक्ष जमा	दि.१.१२.२०२४ ते दि.३१.३.२०२५ पर्यंत अपेक्षित जमा	सन २०२४-२५ चे एकुण जमा		
		१	२	३	४	५
१	इमारत परवाना फी – विकास आकार					
२	नगररचना ना-हरकत/झोन /वेदरशेड दाखला					
३	TDR पासुन उत्पन्न					
४	घर दुरुस्ती / गाळे दुरुस्ती					
५	विकास आराखडा संच विक्री					

मोकळया जागेवरील कर बाबतची माहिती

अ.क्र	लेखाशिर्ष	एकूण वार्षिक मागणी - २०२४-२५ सुधारीत			सन २०२५-२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज	शेरा
		दि.३०.११.२०२४ पर्यंतच्या प्रत्यक्ष जमा	दि.१.१२.२०२४ ते दि.३१.३.२०२५ पर्यंत अपेक्षित जमा	सन २०२४-२५ चे एकुण जमा		
		१	२	३	४	५
१	मोकळया जागेवरील कर					

सहा.संचालक,
(नगररचना विभाग)